



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक ३२१ * नांदेड * सोमवार, दि. ०१ डिसेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मुखेड, धर्माबाद नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलल्या

- भोकर, लोहा, कुंडलवाडीतील प्रत्येकी एका जागेचीही निवडणूक स्थगित
- आता २० तारखेला मतदान, २१ ला मतमोजणी; आयोगाकडून सुधारित कार्यक्रम जाहीर
- राज्यातील इतरही काही नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुका स्थगित



**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** मतदानाला ४८ तासांपेक्षा कमी वेळ शिल्लक असतानाच राज्यातील अनेक नगर परिषद आणि नगर पंचायतींमधील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. प्रचार सोमवारी संपुष्टात येणार होता, पण त्याआधीच काही ठिकाणी नव्याने निवडणुका घेण्यात येत असल्याचे आयोगाकडून जाहीर करण्यात आले. यात नांदेड जिल्ह्यातील मुखेड आणि धर्माबाद या नगरपरिषदांचा समावेश आहे. याचबरोबर भोकर येथील प्रभाग १ ब, लोहा येथील प्रभाग ५ ब आणि कुंडलवाडी येथील प्रभाग ३ अ या ठिकाणच्या जागांवरील निवडणूकही स्थगित करण्यात आली आहे.

नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निर्णयाविरोधात काही उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. त्यामुळे निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

आयोगाकडून सुधारित कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. नांदेड, सोलापूर, पुणे, अमरावती, सांगली, सातारा, धाराशिवसह अनेक जिल्ह्यांतील निवडणुका अथवा काही प्रभागातील निवडणुका पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### सुधारित निवडणूक कार्यक्रम

- **४ डिसेंबर :** जिल्हाधिकारी निवडणूक कार्यक्रम जाहीर करतील.
- **१० डिसेंबर** (दुपारी ३ वाजेपर्यंत): नामनिर्देश मागे घेण्याची अंतिम मुदत.
- **११ डिसेंबर :** चिन्ह वाटप व उमेदवारांची अंतिम यादी जाहीर.
- **२० डिसेंबर :** मतदान.
- **२१ डिसेंबर :** मतमोजणी.
- २३ डिसेंबरपूर्वी : संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पूर्ण.

### निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या जिल्हे

- **नांदेड** – मुखेड, धर्माबाद (भोकर, कुंडलवाडी आणि लोहा नगरपालिकेतील प्रत्येकी एक जागा)
- **अमरावती** – अंजनगाव सुर्जी (नगरपरिषद निवडणूक) ❍ **अकोला** – बाळापूर नगरपालिका
- **अहिल्यानगर** – कोपरगाव, देवळाली, नेवासा, पाथर्डी (नगरपरिषद निवडणूक)
- **सातारा** – फलटण, महाबळेश्वर (नगरपरिषद निवडणूक) ❍ **पुणे** – बारामती, तळेगाव
- **यवतमाळ**–दिग्रस पांढरकवडा, वनी ❍ **सोलापूर** – मंगळवेढा ❍ **चंद्रपूर** – घुग्गुस
- **धाराशिव** – प्रभाग क्र. २ अ, ७ ब आणि १४ ब
- **जालना** – भोकरदन १ अ आणि प्रभाग ९ ब
- **गोंदिया** – वॉर्ड क्रमांक ३, ११ आणि १६.

सध्याच्या निवडणूक कार्यक्रमानुसार, २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार होती. पण आता २० डिसेंबर रोजी मतदान आणि २१ डिसेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होणार आहे. यामुळे उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये ज्या जागेसाठी अपील दाखल होते. परंतु अपीलाचा निकाल संबंधित जिल्हा न्यायालयाकडून दि.२२ नोव्हेंबर २०२५ नंतर म्हणजेच दि.२३ नोव्हेंबर २०२५ किंवा त्यानंतर देण्यात आलेला आहे, अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या त्या जागेच्या निवडणुका ०४ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या कार्यक्रमानुसार घेण्यात येवू नयेत.

तसेच अशा प्रकरणात अध्यक्ष पदाचा समावेश असल्यास त्या संपूर्ण नगरपरिषदेची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे.




## ‘एसआयआर’साठी बारा राज्यांना मुदतवाढ, केंद्रिय निवडणूक आयोगाचा निर्णय!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी) –** केंद्रीय निवडणूक आयोगाने १२ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सध्या सुरु असलेल्या विशेष सघन पुनरावृत्ती (एसआयआर) प्रक्रियेला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाने या प्रक्रियेसाठी अंतिम मुदत ही सात दिवसांनी वाढवली आहे. निवडणूक आयोगाने त्यांचा यापूर्वीचा आदेश रद्द करत एक नवीन वेळापत्रक जारी केले आहे. त्यानुसार, गणना, बूथची पुनर्रचना, मसुदा यादीचे प्रकाशन आणि दावे आणि हरकती आता सुधारित तारखांनुसार केल्या जाणार आहेत.

मुदतवाढ दिलेल्या राज्यांमध्ये अंदमान आणि निकोबार बेटे, छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, लक्षद्वीप, मध्य प्रदेश, पुद्दुचेरी, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल यांचा समावेश आहे.

निवडणूक आयोगाने एसआयआरचे नवीन वेळापत्रक पुढील प्रमाणे जाहीर केले आहे. गणनेचा कालावधी (घर-घर पडताळणी) ११ डिसेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत राहील. मतदान केंद्रांची पुनर्रचना/पुनर्रचना ११ डिसेंबर २०२५ (गुरुवार) पर्यंत करण्यात येणार आहे. नियंत्रण तक्ता मसुदा यादीचे अद्ययावतीकरण आणि तयारी- १२ डिसेंबर २०२५ (शुक्रवार) ते १५ डिसेंबर २०२५ (सोमवार) पर्यंत होईल.

मसुदा मतदार यादीचे प्रकाशन १६ डिसेंबर २०२५ करण्यात येणार आहे. दावे आणि हरकती दाखल करण्याचा कालावधी १६ डिसेंबर २०२५ (मंगळवार) ते १५ जानेवारी २०२६ असा असणार आहे. सूचना टप्पा (सूचना जारी करणे, सुनावणी, पडताळणी आणि निर्णय) ही प्रक्रिया ERO द्वारे दावे आणि आक्षेपांच्या निपटारासोबतच चालेल.

### ११ डिसेंबर अंतिम तारीख

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मते, मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत आणि सुलभ करण्यासाठी ही मुदतवाढ आवश्यक होती. पूर्वी, एसआयआर प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख ४ डिसेंबर होती. म्हणजेच फक्त चार दिवस शिल्लक होते. आता, सात दिवसांच्या मुदतवाढीसह, ही मुदत ११ डिसेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे.

## डिटवाह चक्रीवादळामुळे थंडीचा कडाका वाढण्याची शक्यता

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** श्रीलंकेनंतर आता चक्रीवादळ ‘डिटवाह’ ने भारतात धुमाकूळ घातला आहे. या चक्रीवादळामुळे उत्तर तामिळनाडूच्या अनेक जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पाऊस सुरू असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. आतापर्यंत तामिळनाडूमध्ये तीन जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून तामिळनाडू, पाँडेचेरी, आणि आंध्र प्रदेशमधील अनेक भागांना रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्रात या चक्रीवादळामुळे पुढील दोन दिवस ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. तर काही ठिकाणी तापमानात घसरण होऊन थंडीचा कडाका देखील वाढू शकतो. तर विदर्भातील काही भागांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## रंगतदार सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेवर १७ धावांनी विजय

**रांची (प्रतिनिधी)–** दक्षिण आफ्रिकेने रांचीत टीम इंडिया विरुद्ध ३५० धावांचा पाठलाग करताना शेवटच्या ओव्हरपर्यंत जोरदार झुंज दिली. टीम इंडियाने विराट कोहली याच्या शतकाच्या जोरावर ३४९ धावा करीत १७ धावांनी दक्षिण आफ्रिकेला पराभूत केले.

भारतीय गोलंदाजांनी टॉप ऑर्डरला ११ धावांच्या मोबदल्यात मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. त्यामुळे टीम इंडिया सामना जिंकणारच, असं चित्र होतं. मात्र दक्षिण आफ्रिकेच्या मिडल आणि लोअर ऑर्डरमधील फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांची धुलाई केली. त्यामुळे सामना शेवटच्या ओव्हरपर्यंत गेला. मात्र अखेरच्या ओव्हरमध्ये टीम इंडियाने हा सामना जिंकला.

कॉर्बिन बॉश याने अखेरच्या क्षणी फटकेबाजी केली. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेला शेवटच्या ओव्हरमध्ये १८ धावांची गरज होती. मात्र प्रसिध कृष्णा याने कॉर्बिन बॉश याला आऊट केलं. दक्षिण आफ्रिकेचं यासह पॅकअप झाले. भारतीय गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेला ४९.२ ओव्हरमध्ये ३३२ रन्सवर ऑलआऊट केले. भारताने यासह हा सामना १७ धावांनी जिंकला. भारताने या विजयासह ३ सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे.

भारतीय वेगवान गोलंदाज आणि फिरकीपटूंसमोर दक्षिण आफ्रिकेच्या मॅथ्यू ब्रीट्झके, मार्को यान्सेन आणि कॉर्बिन बॉश यांनाच सामना करता आला. टीम इंडियासाठी कुलदीप यादव याने सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या. हर्षित राणा याने दक्षिण आफ्रिकेच्या ३ फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. अर्शदीप सिंह याने २ विकेट्स मिळवल्या. तर प्रसिधने एकमेव मात्र निर्णायक विकेट घेत भारताला विजयी केलं.




## एक कोटी रुपये दिले तर, नगरपरिषद निवडणुकीत ईव्हीएम मशीन डिल?

**मुंबई (प्रतिनिधी)–** चांदवड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक कथित ‘ऑडिओ क्लिप’ व्हायरल झाल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

नगराध्यक्षपदाचे अपक्ष उमेदवार राकेश अहिरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांना शक्ती विलास ढोमसे यांनी मोबाईलवर संपर्क साधून पैशांच्या बदल्यात निश्चित मते मिळवून देण्याची ऑफर दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ही संपूर्ण ऑडिओ रेकॉर्डिंग काही तासांत सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली असून, यामुळे चांदवडमध्ये राजकीय वातावरण तापले आहे.

अहिरे यांच्या म्हणण्यानुसार, ढोमसे यांनी संभाषणादरम्यान भाजपचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार वैभव बागुल यांना १३ हजार ६४२ मते मिळणार असल्याचा दावा केला. याबाबत विचारणा केल्यावर ईव्हीएम मशीनवाल्याशी बोलणे झाले आहे, असे उत्तर दिल्याचा आरोप आहे. तसेच एक कोटी रुपये दिल्यास तुला ११ हजार २५० मते मिळवून देऊ शकतो अशी ऑफर देण्यात आल्याचा दावा उमेदवारांनी केला आहे.

## ठाकरे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचा तो निर्णय मनमानीचा : किनवटमधील काँग्रेस उमेदवारांचा संताप

**किनवट (प्रतिनिधी)-** पालिका सार्वत्रिक निवडणुकीत सर्व उमेदवार व पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेता तालुकाध्यक्ष व मोजक्या पदाधिकाऱ्यांनी ठाकरे गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला काँग्रेस उमेदवाराचा जाहीर केलेला पाठिंबा हा मनमानी कारभार आहे. तो आम्हाला मान्य नाही. ठाकरे गटाच्या उमेदवारांसाठी आम्ही मत मागणार नाही, आम्ही एकाकी झुंज देवू, अशी माहिती काँग्रेस उमेदवार ॲड. तौफिक कुरेशी व लक्ष्मीपती दोनपेल्लीवार यांनी दिली.

काँग्रेस व मित्रपक्ष महाआघाडीत बिघाडी झाल्यानंतर काँग्रेस पक्षाने नगराध्यक्षपदासाठी शेख तयबाबेगम शेख खाजामियाँ यांना उमेदवारी दिली होती. निवडणुकीला ४ दिवस शिल्लक असताना पक्षाचे तालुकाध्यक्ष के. सूर्यकांत रेड्डी, शहराध्यक्ष गिरीश नेम्मानीवार, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती आदींनी शनिवारी दि.२९ ठाकरे गटाच्या संपर्क कार्यालयात पत्रकार परिषद घेवून नाट्यमयरित्या उमेदवार शेख तयबाबेगम यांच्या उपस्थितीत ठाकरे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला होता. काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या या कृतीबद्दल रविवारी दि.३० रोजी काँग्रेस पक्षाच्या विविध प्रभागांतील उमेदवारांनी माध्यमांसमोर संताप व्यक्त केला.तालुकाध्यक्ष व मोजक्या पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा देण्याचा निर्णय व्यक्तिगत आहे.आम्ही प्रभागांतून निवडून येण्यासाठी जीवाचे रान करीत असताना पदाधिकाऱ्यांनी मनमानी पद्धतीने पाठिंबा जाहीर केला. आम्ही हा निर्णय त्यांच्यापुरताच असल्याचे मानतो. ठाकरे गटाच्या उमेदवारासाठी आम्ही मत मागणार नाही, असे प्रभाग क्रं.९ मधील काँग्रेस उमेदवार ॲड. तौफिक कुरेशी यांनी स्पष्ट केले.




## घरात दीड वर्षाच्या बाळासह एकाच कुटुंबातील ४ जणांचे मृतदेह सापडले

**नाशिक (प्रतिनिधी) –** जिल्ह्याच्या देवळा तालुक्यातील फुले माळीवाडा येथे रविवारी दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी उघडकीस आलेल्या एका धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. एकाच कुटुंबातील चार जणांचे मृतदेह घरात आढळून आले असून, मृतांमध्ये पती, पत्नी आणि त्यांच्या दोन्ही अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. या घटनेमागील कारण अद्याप अस्पष्ट असून, प्राथमिक पाहण्यात ही घटना आत्महत्येची असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

मृतांमध्ये गोविंद बाळू शेवाळे (४०), त्यांची पत्नी कोमल गोविंद शेवाळे (३५), मुलगी खुशी गोविंद शेवाळे (८) आणि दीडदोन वर्षांचा मुलगा श्याम गोविंद शेवाळे यांचा समावेश आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोविंद बाळू शेवाळे याने स्वतः दोरीने फाशी घेऊन आत्महत्या केली असल्याचे दिसून येत आहे. तर पत्नी, एक मुलगी, एक मुलगा यांचा मृतदेह झोपलेल्या अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे. मात्र एकाच कुटुंबातील चार मृतदेह आढळल्याने नाशिकमध्ये खळबळ उडाली आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# डिजिटल डेटा सुरक्षेची नवी कसोटी

भारताने अखेर डिजिटल युगातील सर्वांत महत्त्वपूर्ण पाऊल उचलत डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन नियम अधिसूचित केले आहेत. कायदा मंजूर होऊन जवळपास दोन वर्षांनी हे नियम जाहीर झाले असले तरी, डिजिटल नागरिकांची संख्या कोट्यवधींच्या घरात असलेल्या देशासाठी डेटा संरक्षणाचे एकसंध व अधिकार-आधारित ढाचे तयार होणे अत्यावश्यकच होते. सरकारने घाईगडबडीत निर्णय न घेता स्पष्ट, सुबोध आणि अंमलबजावणीयोग्य नियम आखण्याचा प्रयत्न केला आहे, ही बाब निश्चितच समाधानकारक आहे. उद्योगक्षेत्रासाठी १२ ते १८ महिन्यांचा दिलेला संक्रमण कालावधी हा वास्तववादी दृष्टिकोन दाखवतो. डेटा संरक्षण ही एका दिवसात होणारी प्रक्रिया नसून, त्यासाठी कंपन्यांना संपूर्ण प्रणालीतील सुधारणा कराव्या लागतात जसे कन्सेंट फ्लो पुन्हा डिझाईन करणे, डेटा-रिटेन्शन पद्धतीं-मध्ये बदल, जुनी सिस्टीम्स अद्ययावत करणे अशा अनेक पायऱ्या त्यात येतात. या नियमांची मूलतत्त्वे व उद्देश-सीमितता, डेटा-मिनिमायझेशन आणि स्टोरेज-लिमिटेशन हे सर्वत्र दिसून येतात. एखाद्या उद्देशासाठी गोळा केलेला डेटा दुसऱ्या उद्देशासाठी वापरण्याकरिता पुन्हा स्पष्ट संमती घेणे बंधनकारक आहे. तसेच आवश्यक त्या किमान माहितीपुरतेच संकलन मर्यादित राहावे आणि उद्देश पूर्ण झाल्यावर वैयक्तिक डेटा अनावश्यकरीत्या साठवून ठेवू नये, हा नियम अत्यंत महत्त्वाचा आहे. परंतु खरी परीक्षा तेव्हा सुरू होणार आहे जेव्हा १८ महिन्यांची मुदत संपेल आणि हे आदर्श उद्योगक्षेत्र प्रत्यक्षात उतरवेल. आंतरदेशीय डेटा हस्तांतरणाबाबत सरकारने घेतलेला संतुलित दृष्टिकोन उल्लेखनीय आहे. सर्व डेटा देशातच ठेवण्याचा कठोर आग्रह न धरता, मूळ तत्त्व परदेशातील डेटा ट्रान्सफरला परवानगी देणारे आहे. फक्त विशिष्ट देश किंवा संस्थांवर सार्वजनिक हित, राष्ट्रीय सुरक्षा किंवा भू-राजकीय कारणांसाठी निर्बंध घालण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे असणार आहे. जागतिक तंत्रज्ञान कंपन्यांना कमी सरकारी हस्तक्षेप हवा असला तरी, देशातील संवेदनशील डेटा संरक्षित करण्याचा अधिकार सरकारकडे असणेही तितकेच आवश्यक आहे. तथापि, सरकारी अधिकारांची व्याप्ती मोठी असल्याने माहितीचा अधिकार कायदा कमकुवत होईल का, अशी शंका काही तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. परंतु त्याहूनही मोठे आव्हान समोर आहे ते म्हणजे जनरेटिव्ह एआयचे अर्थात निर्माण करणारी कृत्रिम बुद्धिमत्ताचे बदलते रूप. डेटा निर्माण, विश्लेषण आणि वापर यांची गती धोरणनिर्मितीपेक्षा अनेक पटींनी जास्त आहे. वर्तन-आधारित लक्ष्यीकरण, यासारख्या नव्या तंत्रज्ञानामुळे डेटा संरक्षणाचे गणित दिवसेंदिवस गुंतागुंतीचे बनत आहे. या पार्श्वभूमीवर सरकारची सध्याची भूमिका अशी की, सदरील नियम हे डेटा गव्हर्नन्सचे आधारस्तंभ ठरतील; तर एआयसाठी लवचिक संमती प्रणाली, पारदर्शकता निकष आणि तक्रार निवारण यंत्रणा पुढे विकसित केली जाईल. आवश्यक असल्यास पुढील काळात कायद्यात दुरुस्त्या करण्याची दारंही उघडी ठेवण्यात आली आहेत. कारण डेटा आणि तंत्रज्ञान यांचा स्वभावच गतिशील आहे. जे आज सुरक्षित मानले जाते ते उद्या अपुरे ठरू शकते. हा कायदा आणि नियमांनी पायाभूत रचना मजबूत केली आहे, हे निर्विवाद आहे. पण ती रचना टिकावदार आणि भविष्यकालीन ठरेल का, हे सततच्या अद्ययावतीकरणावर आणि नियामक यंत्रणेच्या तत्पर प्रतिसादावर अवलंबून असेल. नाविन्याशी स्पर्धा करत राहण्याची ही अखंड प्रक्रिया आहे. म्हणूनच हे नियम अधिसूचित होणे हे शेवट नसून, खरी सुरुवात आहे ती भारतातील डिजिटल डेटा सुरक्षेच्या नव्या युगाची आणि त्यासोबत असलेल्या कठोर परीक्षेची.

# एड्सविरुद्धची समाजक्रांती : आजारापेक्षा कलंक घातक



दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस 'जागतिक एड्स दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैद्यकीयदृष्ट्या नसून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानवी मूल्यांच्या स्तरावर अत्यंत मोठे आहे. कारण एड्स हा आजार मानवी शरीरावर जितका परिणाम करतो त्याहून अधिक तो सामाजिक मनोवृत्ती, पूर्वग्रह, भीती, अज्ञान आणि विषमता यांच्याशी संबंधित आहे. एड्सविषयी बोलताना जगाला सर्वप्रथम जे शिकावे लागले ते म्हणजे हा आजार वैद्यकीय उपचारांनी काही प्रमाणात नियंत्रित होऊ शकतो, पण समाजातील भीती, तिरस्कार आणि भेदभावाविरुद्धची लढाई अधिक कठीण आहे. त्यामुळेच जागतिक एड्स दिवस हा केवळ स्मरणदिन नसून जाणीव, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे.

एचआयव्ही आणि एड्सचा इतिहास पाहिला तर १९८० च्या दशकात जेव्हा हा आजार जगासमोर आला, तेव्हा विज्ञानापेक्षा अफवा, संशय आणि अंधविश्वास अधिक वेगाने पसरले. हा आजार 'पाप', 'अनैतिकता', 'भ्रष्ट वर्तन' किंवा 'सामाजिक अधःपतन' यांचे प्रतीक मानला जाऊ लागला. त्यामुळे एचआयव्हीग्रस्त व्यक्तीला लागणारा धक्का हा आजारापेक्षा समाजाच्या प्रतिक्रिया, बहिष्कार आणि मानसिक तणावामुळे जास्त गंभीर होता. समाजशास्त्र सांगते की कोणताही रोग हा केवळ शरीराशी संबंधित नसतो; तो समाजाच्या मूल्यव्यवस्था, नैतिकता, सत्ता, आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक मनोवृत्तीशी जोडलेला असतो. एड्स या आजाराने हे सत्य स्पष्ट केले.

आज जगात एचआयव्हीवर उपचार उपलब्ध आहेत. 'अँटी रेट्रो व्हायरल थेरपी'मुळे एचआयव्हीसह दीर्घायुषी, निरोगी आणि सन्मानाने जीवन जगणे शक्य झाले आहे. तरीही ग्रामीण भागात आजही अनेक मिथके जिवंत आहेत, एड्स स्पर्शाने पसरतो, भांडी शेअर केल्याने होतो, रक्तदानातून किंवा एकत्र बसल्याने लागतो अशी चुकीची धारणा अनेकांची आहे. या अज्ञानामुळे तपासणी न करण्याकडे झुकणारा मानसिकतेचा अडसर निर्माण होतो, आणि वेळेवर उपचार मिळत नाहीत. समाजाने रोगापेक्षा त्या रोगाशी जोडलेल्या चुकीच्या समजुतींविरुद्ध लढा देणे आवश्यक आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर एड्स ही केवळ आरोग्य समस्या नाही, तर सामाजिक अन्याय, गरीबी, लैंगिक असमानता, दलित-वंचित गटांवरील भेदभाव, स्थलांतर, हिंसा, वेश्या व्यवसाय, औषधांचे व्यसन, लैंगिक शिक्षणाचा अभाव आणि लिंगविषयक पूर्वग्रह यांचे प्रतिबिंब आहे. एचआयव्हीचा प्रसार जिथे जास्त आहे तेथील लोकसंख्या ही केवळ वैद्यकीय दृष्ट्या नाही तर सामाजिक दृष्ट्याही असुरक्षित आहे. स्थलांतरित कामगार, लैंगिक हिंसा सहन करणाऱ्या महिला, तृतीयपंथी समुदाय, वेश्या व्यवसायात असलेल्या महिला, इंजेक्शनच्या माध्यमातून ड्रग्ज घेणारे व्यक्ती, तरुण वयातील लैंगिक शिक्षणापासून वंचित विद्यार्थी आणि उपेक्षित समुदाय हे सर्व जास्त धोक्यात असतात. त्यांच्या जीवनातील असुरक्षितता आणि संसाधनांचा अभाव हा संसर्गाच्या जोखमीला वाढवतो.

विशेषतः महिलांच्या संदर्भात एड्सचा प्रश्न समाजातील पितृसत्ताक रचनेशी थेट जोडलेला आहे. अनेक महिलांना विवाहानंतरही सुरक्षित लैंगिकतेबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार नसतो. कौटुंबिक नातेसंबंधातील असमानता महिलांना एड्सच्या धोक्यापासून दूर रहाण्याचा अधिकार हिरावून घेते. समाजात अजूनही 'पुरुषांच्या लैंगिक वर्तनाबाबत सहनशीलता' आणि 'स्त्रियांनी शांतपणे स्वीकारण्याची अपेक्षा' ही मानसिकता अनेक ठिकाणी दिसते. त्यामुळे एड्सविरोधातील लढाई ही स्त्री-पुरुष समानतेची लढाईही आहे.

तृतीयपंथी समुदायाची स्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. सामाजिक बहिष्कार, रोजगाराचा अभाव, शिक्षणातील दुय्यमता आणि आरोग्य व्यवस्थेतील दुर्लक्षामुळे त्यांना उपचार, समुपदेशन आणि सन्मानाने सेवा मिळणे कठीण ठरते. समाजाने लैंगिकता आणि लैंगिक अभिव्यक्तीच्या विविधतेला स्वीकारल्याशिवाय एड्स नियंत्रणाचा उद्देश पूर्ण होणार नाही.

एचआयव्ही प्रतिबंधामध्ये जागरूकता, सुरक्षित लैंगिकतेचा प्रसार, रक्त आणि सुईंचे सुरक्षित नियमन, लैंगिक शिक्षण, समुपदेशन आणि तपासणी यांना फार महत्व आहे. परंतु त्याहून अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे समाजाची मानसिकता बदलणे. एचआयव्हीग्रस्त व्यक्तींविषयीचा तिरस्कार संपला पाहिजे. त्यांच्याशी गुन्हेगारासारखे नव्हे तर सहानुभूती, सन्मान आणि समजुतीने वागण्याची गरज आहे. आजाराशी झुंज देणाऱ्या व्यक्तीला समर्थनाची आवश्यकता असते, न्यायाची नव्हे.

आज तंत्रज्ञानाद्वारे माहिती मिळवणे सोपे झाले आहे आणि युवा पिढी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारत आहे, ही बदलाची खूण आहे. शाळा-कॉलेज स्तरावर आरोग्य आणि लैंगिक शिक्षण अनिवार्य होणे गरजेचे आहे. माध्यमांनी सनसनाटीपेक्षा जागरूकतेची भूमिका निभावली पाहिजे. डॉक्टर, समाजशास्त्रज्ञ, स्वयंसेवी संस्था, शासन आणि नागरिक यांनी एकत्रितपणे वैज्ञानिक माहिती, संवेदनशीलता आणि मानवाधिकार यांवर आधारित कार्ययोजना राबवणे आवश्यक आहे.

एड्सविरोधातील चालू मोहिमेत 'उपचार', 'प्रतिबंध' आणि 'जागरूकता' यांच्याबरोबरच 'मानवता' आणि 'समानतेचा अधिकार' हे दोन मुद्दे केंद्रस्थानी असायला हवेत. कारण एड्सविषयीचा सर्वात मोठा धोका हा रोग नाही, तर त्याच्याशी जोडलेला कलंक, भीती आणि सामाजिक न्यायाचा अभाव आहे. समाज बदलला, विचार बदलले, आणि प्रत्येक व्यक्तीला न्याय्य सन्मान मिळाला तर एड्स हा आजार नियंत्रणात आणणे आणि भविष्यात त्याचे उच्चाटन करणे शक्य होईल. म्हणूनच जागतिक एड्स दिन आपल्याला आठवण करून देतो की, एचआयव्हीग्रस्त व्यक्ती 'इतर' कोणी नाही तर तो आपल्याच समाजाचा, आपल्या मानवतेचा भाग आहे. आजारी शरीराला औषध मिळते, पण जखमी मनाला स्वीकार, आधार आणि सन्मान लागतो. आणि जेव्हा समाज उपचाराइतकाच सन्मान देईल, तेव्हा एड्सविरोधातील खरी लढाई जिंकली जाईल.

-डॉ. राजेंद्र बगाटे
हिंगोली
मो. ९९६०१०३५८२

# भौतिक सुखाच्या स्पर्धेत माणूस सैरभैर

आधुनिकतेच्या जोखडाखाली हळूहळू आपले मूळ अस्तित्व विसरून चाललेले असताना, आपण जीवनाच्या वाटेवर एवढ्या जलद गतीने पुढे जाण्याचा प्रयत्न करत आहोत, कीप्रत्येक गोष्टी मध्ये स्पर्धा, व त्याच्यासाठी जीव घेणी घोड दौड चालू आहे. एवढे करूनही माणूस आज समाधानी आहे का? ज्या सुखा च्या, समाधानाच्या अपेक्षेने, आजचा माणूस प्रचंड तणाव डोक्यावर बाळगून, जीवन जगतो, खरंच ते सुख किंवा समाधान आपणास मिळते का?खरे समाधान हे आपल्या मानण्यावर आहे. एखाद्या गरीब फुगे विकणाऱ्याला, फुगे विकून आलेल्या तुटपुंज्या रकमेत समाधान होते, तर समाजातील धनाढ्य व्यक्ती दुसरीकडे असमाधानी असल्याचे अनेक दाखले देता येतात.



समाधान ही मनाची मशागत असून, ती आपल्या जीवनात चैतन्याचा झरा निर्माण करते.म्हणूनच,

जगी सर्व सुखी असा
कोण आहे ,विचारी मना
तू शोधूनी पाहे

वरील ओळी आपणास काय दर्शवतात? तर आपण जीवन जगत असताना, स्व मूल्यमापन करून आपण खरेच सुखी-समाधानी आहोत का याचा विचार करणे अपेक्षित आहे. आपले समाधान आपल्या मनाच्या कक्षेतील बाब आहे.परंतु आजच्या जीवघेण्या भौतिक स्पर्धेत,मनाला निश्चितच अपेक्षित समाधान मिळत नाही. व त्याही पुढे जाऊन, निश्चित समाधान नेमके किती व कसे हेसुद्धा आपल्याला ठाऊक नाही.समाधानाचे दुकान कुठे आहे का ? नेमकी किती संपत्ती दिल्यावर ते प्राप्त होते ? ते विकत घेता येते का ?समाधान हे नेमके आपल्या मानण्यावर असते. समाधान ही अप्रतिम, अमूर्त शक्ती असून, ती आपल्या जीवनात आनंद निर्माण करू शकते.

खूप काही प्राप्त करण्याच्या नादात, आपण आपल्या जवळील आनंद सुद्धा गमावून बसतो. मिडास राजाची कथा असो किंवा आजच्या माणसाची कथा असो आपण जीवनात जेवढे मिळेल तेवढ्यावर समाधान न मानता आणखी मिळत राहावे ही अपेक्षा करत असतो.आपल्याला किती संपत्ती मिळाली म्हणजे आपण सुखी व समाधानी आहोत याचे गणित आपल्याकडे नाही.

असे म्हणतात की,

अपेक्षेच्या आभाळाला मर्यादा नसते, परंतु मर्यादे पलीकडे अपेक्षा बाळगल्या तर पदरात अपेक्षेच्या अपूर्ततेचे दुःख पडते व आपण पुन्हा असमाधानी होतो. म्हणून जीवन रुपी गाडीच्या चाकात, समाधानाचे वंगण घालून, ते चालवणे म्हणजे एक पाऊल सुखाकडे टाकल्यासारखे असते. बाह्य जीवनात सतत समाधानी असण्यासाठी, अगोदर अंतर्मनात वास्तविक समाधानाच्या भावाचे वास्तव्य निर्माण करावे लागते, नाहीतर अंतरंगातून असमाधानी व वरून केवळ समाधानी असल्याचा खोटा अभिनय आपल्याला करावा लागतो. अपार भौतिक समृद्धी लाभलेला मनुष्य, एकीकडे असमाधानी दिसतो व सतत धनप्राप्ती च्या मागे लागून विविध प्रकारचे दुःख अंगावर ओढून घेतो, तर दुसरीकडे अनेक माणसांमध्ये

समाजासाठी काहीतरी कार्य केल्याने, समाधानाची भावना दिसून येते पण ती अंतरंगातील असते हेही खरे. म्हणून खरे समाधान अंतरंगातून असावे , वरवरच समाधान फसव असते. आता ही बाब खालील उदाहरणावरून समजून घेऊ,

एका राजाने एकदा त्याच्या राज दरबारातून फेरी मारली व तो लोकांना विचारत सुटला, की आपणास काही हवे आहे का, कुणाला काही कशाची कमी आहे का? त्यावर प्रत्येकजण आपण किती सुखी व समाधानी आहोत हे फार आनंदाने सांगत होता. मग राजाने त्याची परीक्षा पाहायचे ठरवले, दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या राजवाड्यात त्यांना सगळ्याना बोलावून घेतले, व त्यांच्या सगळ्यांपुढे हिरे, मोती,सुवर्ण व लोकांनी न पाहिलेले अनेक खाद्यपदार्थ ठेवले व त्यापैकी त्यांना जे हवे ते घ्यायला सांगितले. काल आमच्याकडे सगळे आहे व आम्ही खूप समाधानी आहोत अशी म्हणणारी लोक ,आता हे सगळं पाहून,अत्रुप्त माणसा सारखे त्या खाद्यपदार्थावर तुटून पडले व सुवर्ण व हिरे भरून घ्यायला लागले. राजाने नेमके काय ते ओळखले.

आता वरील प्रसंगावरून, सहज लक्षात येते की, आपण केवळ वरून समाधानी आहोत असे दाखवत असतो व आणखी भेटण्याची लाभ होण्याची हाव व लालसा बाळगत असतो. संत परंपरेतील अनेक संतांची उदाहरण आपणास घेता येतील, की सर्व संत त्यांच्याकडे जेवढ काही जगण्यासाठी आहे ,ते त्याच्यातच समाधानाने जीवन जगले व त्यांनी त्यातही समाजाला देण्याचं कार्य केलं.

इतरांना काहीतरी देण्यासाठी आपले मन अगोदर समाधानी असणे अपेक्षित आहे.असे म्हणतात की,

ठेविले अनंते
तेथेचि राहावे
चित्ती असू द्यावे समाधान

यावरून चित्त किंवा मन समाधानी असणे आवश्यक असून, मन जर तृप्त असेल तर त्यात समाधानाचा संचार होतो. अमर्यादित अपेक्षांच्या ओझ्याखाली येऊन, आपण आपले जीवन दुखी बनवतो. जगज्जेता सिकंदर सुद्धा, मृत्यूच्या वेळी रिकाम्या हाताने जातो, नव्हे नव्हे कितीही संपत्ती प्राप्त करणे व त्यासाठी शरीराची, संपत्ती गमावून बसणे व परत असमाधानी किंवा दुखी होणे यापेक्षा, आपल्या हातात आज जे काही आहे, त्यात श्रमाने वाढवण्याचा प्रयत्न करणे व समाधानाने जगणे हीच बाब सत्य असून ते अंतिम आहे.

किती अर्थ प्राप्ती केली, म्हणजे माणूस श्रीमंत होतो, हे कुणीच सांगू शकत नाही, तसेच कितीही संपत्ती दिली तरी जगाच्या कोणत्याही बाजारात समाधान विकत घेतल्या जाऊ शकत नाही.समाधान मिळवण्याच उत्कृष्ट उगमस्त्रोत म्हणजे स्व चित्त व मन होय, व जो अंतर्मनाने समाधानी असेल, तोच खरा समाधानी व्यक्ती ,हेही तेवढेच खरे आहे. जीवनभर पायाला भिंगरी लाऊन कितीही संपत्ती गोळा केली, तरी ती आपल्या मनाला खरे सुख व समाधान देऊ शकत नाही, उलट ती आपल्या जीवनात नाना प्रकारचे दुःख घेऊन येते याचे अनेक उदाहरण आपल्याला देता येतील. म्हणून समाधान हे केवळ स्वतःच्या मानण्यावर असून, ते आपल्या स्वतःच्या जवळच असते, हेही तेवढेच खरे पण काखेत कळसा आणि गावाला वळसाया उक्तीप्रमाणे आपण समाधानाचा शोध दुसरीकडेच घेत फिरतो.

स्वार्थापोटी, अती संपत्तीचा संचय करण्याची अभिलाषा, प्रचंड व्यावहारिकता, भावनाशून्य व्यवहार व मोठे व श्रीमंत होण्याची तीव्र इच्छा माणसाला माणसापासून, नात्यापासून व हळूहळू शरीर व जीवनापासून एका अशा वळणावर घेऊन जाते, की माणूस पूर्णपणे दुखी व असमाधानी होतो.जीवनभर कितीही अर्थार्जन केले, तरी विचाराचे किंवा मनाचे पूर्णपणे समाधान झाल्याशिवाय त्याचा फायदा नाही. समाधानाच्या संपत्तीची तुलना, विश्वातील कुठल्याच संपत्ती सोबत होऊ शकत नाही.

समाधानाचे बीज, जीवन नावाच्या जमिनीत पेरले, तरसुखी जीवनाचे पीक भरभरून येईल व आपल्या जीवनात चैतन्याचा, व खऱ्या आनंदाचा झरा वाहत जाऊन, मनातील असंतुष्ट आकाशात,समाधानाचे ढग निर्माण करता येतील. आजच्या आधुनिक जगातील माणसाच जीवन दुःखी असण्याचे कारण म्हणजे,प्रत्येक बाबतीत टोकाची इच्छा, व अपार संपत्ती निर्माण करण्याची लालसा पण जीवनाचे सत्य हेच आहे की,

जिंदगी भर कमाले
चाहे जित्ने हिरे-मोती,
लेकिन ए बंदे
याद रख ,कफन
मे जेब नही होती.

जीवनभर पैसा, संपत्ती कमावून, मृत्यूच्या गावाला मात्र रिकाम्या हाताने जाणे हेच अंतिम व शाश्वत सत्य असून, कफन रुपी वस्त्राला, वर सोबत काही घेऊन जाण्यासाठी खिसा किंवा पॉकेट नसते हे लक्षात घेतले ,तर जीवनात आनंदाचे डोही आनंद तरंग निर्माण होतील.

जीवनभर अर्थ प्राप्तीसाठी जगून व त्यासाठी हे शरीर झिजवून शेवटी रिकाम्या हाताने या जगाचा निरोप घेणे हीच या मनुष्य जीवनाची खरी व्यथा आहे...खरंच जीवन जगण्यासाठी अमर्याद अर्थप्राप्ती करणे आवश्यक आहे का ? हा एक विचार करायला लावणारा प्रश्न आहे .खरे सुख व समाधान स्वतच्या मानण्यात आहे, बाकी सगळा लोभ व मायेचा भ्रमिष्ट बाजार आहे.

-प्रा. अमित शिंदे.
मु .पो. रोही पिंपळगाव
ता मुदखेड .जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६,
८९५६५४७३७१.

# नेपाळची नवी खोड

नेपाळ हा भारताचा सख्खा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी असला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे.

भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही खोड काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी खोड काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने गुरुवारी १०० रुपयांच्या नोटेचे अनावरण केले. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले आहे अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र या नोटाचे



अनावरण करण्यात आले त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत.

वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताची सातत्याने खोड काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे.

नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही. काय आहे सीमा वाद ?

१८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारा नुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०२० साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची खोड काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.

-श्याम ठाणेदार
दौंड, जि. पुणे

# रांचीत किंग कोहलीचा धमाका! वनडेत ५२ वे शतक झळकावत विराट कोहलीने रचला इतिहास



**रांची(वृत्तसंस्था)-** भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील रांची येथील गडउ आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहली याने एक मोठा आणि ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. विराट कोहली आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका विशिष्ट फॉरमॅटमध्ये सर्वाधिक शतके ठोकणारा फलंदाज ठरला आहे. या कामगिरीसह त्याने महान फलंदाज सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला आहे. या सामन्यात कोहलीने अवघ्या १०२ चेंडूत आपली शानदार शतकी खेळी (१००) पूर्ण केली. हे त्याचे एकदिवसीय क्रिकेट-मधील ५२ वे शतक आहे.

यापूर्वी, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच फॉरमॅटमध्ये सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर होता. सचिनने आपल्या कारकिर्दीत कसोटी क्रिकेटमध्ये ५१ शतके झळकावली होती. विराट कोहलीने या सामन्यात ५२ वे वनडे शतक झळकावून, एका विशिष्ट फॉरमॅटमध्ये ५१ हून अधिक शतके करणारा तो जगातील पहिला फलंदाज बनला आहे. या विक्रमामुळे कोहलीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विराट कोहलीने रांची येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावून एक दुहेरी विक्रम आपल्या नावावर केला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच फॉरमॅटमध्ये सर्वाधिक शतके करण्याचा विक्रम केल्यानंतर, त्याने मायदेशात पन्नासपेक्षा अधिक धावा करण्याचाही विक्रम मोडला आहे. वनडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपल्या मायदेशात (भारतात) सर्वाधिक वेळा पन्नासपेक्षा अधिक धावा (५०+) करण्याचा विक्रम आता विराट कोहलीच्या नावावर झाला आहे. सध्याचा स्कोअर (शतक) हा कोहलीचा भारतात या फॉरमॅटमधील ५९ वा पन्नासपेक्षा अधिक धावांचा स्कोअर आहे. या ऐतिहासिक कामगिरीसह कोहलीने महान फलंदाज सचिन तेंडुलकरला मागे टाकले आहे. सचिन तेंडुलकरने आपल्या मायदेशात ५८ वेळा पन्नासपेक्षा अधिक धावांची खेळी केली होती. या यादीत दक्षिण आफ्रिकेचा जॅक कॅलिस (४६) आणि ऑस्ट्रेलियाचा रिकी पॉन्टिंग (४५) यांचाही समावेश आहे. अशी सातत्यपूर्ण कामगिरी केल्यामुळे त्याचे 'किंग कोहली' हे बिरुद अधिकच बळकट झाले आहे.

# ५ डिसेंबरला महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना सुट्टी

**मुंबई (प्रतिनिधी) -** महाराष्ट्रातील अनेक शाळा ५ डिसेंबरला बंद राहण्याची दाट शक्यता आहे. यामागील कारण ठरणार आहेत शिक्षक! महाराष्ट्रातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी ५ डिसेंबर रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. हे आंदोलन मुख्यतः शिक्षक पात्रता परीक्षा सक्ती, संच मान्यता संदर्भातील शासन निर्णय रद्द करण्यासाठी आणि इतर प्रलंबित मागण्यांसाठी आहे. या आंदोलना-मुळे राज्यातील बहुतेक शाळा बंद राहणार आहेत. शिक्षक जिल्हाधिकारी कार्यालयांवर मोर्चे काढणार आहेत. हे आंदोलन शिक्षकांच्या हक्कांसाठी एक मोठी चळवळ असून, त्यात प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांचा समावेश आहे.



शिक्षण धोरणातील बदलांमुळे २० ते २५ हजार शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका निम र्ण झाला आहे. विशेषतः ग्रामीण, आदिवासी आणि तांडा भागातील शाळांवर याचा मोठा परिणाम होणार असून, शाळांच्या अस्तित्व-ावरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या पार्श्व-भूमीवर ५ डिसेंबरला शाळा बंद पाळण्याचे आ-वाहन शिक्षक आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी केले आहे. शासनाच्या नव्या नियोजनानुसार ९ ते १० हजार शाळांत शून्य किंवा एकच शिक्षक राहण्याची शक्यता असून, ७ ते ८ हजार शाळांमध्ये फक्त दोनच शिक्षकांवर सर्व भार पडणार आहे. अंदाजे १८ हजार गावतांडा शाळा आणि २५ ते ३० रात्रशाळा बंद पडण्याची शक्यता अभ्यंकर यांनी व्यक्त केली आहे.

शिक्षक संघटनांनी खालील प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत, ज्यामुळे हे आंदोलन सुरू झाले.

टीईटी सक्ती रद्द करणे: २० वर्षांपूर्वीच्या शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य करण्याच्या निर्णयाचा विरोध. हा नियम जुने शिक्षकांना लागू करू नये, अशी मागणी.

१५ ऑक्टोबर २०२४ च्या संच मान्यता जीआर रद्द करणे: शाळांच्या स्टाफिंग आणि मान्यतेशी संबंधित शासन निर्णय रद्द करण्याची मागणी, ज्यामुळे शिक्षकांच्या नोकऱ्या आणि वेतनावर परिणाम होत आहे.

जुनी पेन्शन योजना पूर्ववत करणे: नव्या पेन्शन योजनेऐवजी जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी.

इतर प्रलंबित मुद्दे: आधार सेन्सस विलंब, अनुदान वाटपातील उशीर, नियमित वेतन श्रेणी, आणि शिक्षकांच्या इतर हक्कांसंबंधी समस्या. या मागण्या पूर्ण न झाल्याने शिक्षक संतप्त असून, त्यांनी शाळा बंद आणि मोर्चे काढण्याचा निर्णय घेतला आहे.

# निवडणूक आयोगाचा मोठा दिलासा! बूथ लेव्हल ऑफिसरचं मानधन दुप्पट




**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** देशातील अनेक राज्यांमध्ये सध्या मतदार यादीचे विशेष सघन पु-नरीक्षण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. आयोगाने बूथ लेव्हल ऑफिसर आणि बीएलओ सुपरवायझर यांच्या मानधनात भरघोस वाढ करण्याची घोषणा केली आहे. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, बूथ लेव्हल ऑफिसर यांना आतापर्यंत ६,००० रुपये इतके मानधन मिळत होते, त्यात वाढ करून ते आता १२,००० रुपये इतके करण्यात आले आहे. म्हणजेच बीएलओच्या मानधनात थेट दुप्पट वाढ झाली आहे. याशिवाय, बीएलओ सुपरवायझरच्या मानधनातही मोठी वाढ करण्यात आली आहे. सुपरवायझरला पूर्वी १२,००० रुपये मानधन मिळत होते, ते आता वाढवून १८,००० रुपये इतके करण्यात आले आहे. निवडणूक आयोगाच्या या निर्णयामुळे मतदार यादी पुनरीक्षण कार्यात सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या कामाला मोठी प्रोत्साहन मिळणार आहे.

देशात मतदार यादीचे विशेष सघन पुनरीक्षण प्रक्रिया सुरू असतानाच, विविध राज्यांमध्ये बूथ लेव्हल ऑफिसर यांच्या मृत्यूच्या काही धक्कादायक घटना समोर आल्या होत्या. विशेष म्हणजे, कामाच्या अतिरिक्त ताणामुळे काही ठिकाणी बीएलओनी आत्महत्या केल्याचा आरोप त्यांच्या नातेवाईकांनी केला होता, ज्यामुळे या मुद्द्याला गंभीर राजकीय वळण मिळाले. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री अखिलेश यादव यांच्यासह इतर अनेक प्रमुख नेत्यांनी बीएलओच्या मृत्यूचा मुद्दा जोरदारपणे मांडला होता. या नेत्यांनी निवडणूक आयोगावर बीएलओवरील वाढलेला कामाचा दबाव आणि त्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल तीव्र टीका केली होती. त्यांनी आयोगाला या गंभीर बाबीत लक्ष घालून तातडीने कारवाई करण्याचे आवाहन केले होते. या राजकीय आणि सामाजिक दबावामुळे अखेर निवडणूक आयोगाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. बीएलओंवरील कामाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने आणि त्यांच्या परिश्रमाची दखल घेत, आयोगाने बीएलओ आणि बीएलओ सुपरवायझरच्या मानधनात भरघोस वाढ करण्याची घोषणा केली आहे.

# मुंबईच्या प्रभादेवीत राडा; शिवसेनेचे समाधान सरवणकर आणि स्थानिकांमध्ये वाद



**मुंबई (प्रतिनिधी)-**मुंबई महापालिका निवडणुकांच्या आधी वातावरण तापायला सुरुवात झाली आहे. मुंबईच्या प्रभादेवी येथे अशीच एक घटना समोर आली आहे. शिवसेनेचे माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या शाखेवरुन स्थानिक नागरिक आणि शिवसैनिकांमध्ये मोठा वाद झाला. प्रभादेवी येथील साई सुंदर नगर येथे सकाळी साडेअकरा ते बारा वाजेच्या सुमारास वाद झाला होता. या वादाचा व्हिडीओ देखील आता समोर आला आहे. इमारतीत शाखेच्या बाहेर तात्प-ुरता जे शेड उभारण्यात आलं आहे त्याला स्थानिकांनी विरोध केला. त्यावरुन हा वाद उफाळून आला. आपात्कालीन परिस्थिती शेडचा अडथळा येऊ शकतो, असं काही स्थानिकांचं म्हणणं होतं. स्थानिकांनी विरोध केल्यामुळे तिथे समाधान सरवणकर आले होते. तसेच शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते देखील होते, अशी माहिती आहे.

स्थानिकांच्या विरोधानंतर दोन्ही बाजूने बाचाबाची झाली. या बाचाबाचीचं रुपांतर नंतर मोठ्या भांडणाच झाल्याचं समोर आलं आहे. यावेळी एकमेकांवर हेल्मेट भिरकावण्याचा प्रकार झाला. या घटनेचा जो व्हिडीओ समोर आला आहे. त्यामध्ये वादाची घटना कैद झाली आहे. स्थानिकांच्या रोषानंतर समाधान सरवणकर यांनी तिथून काढता पाय घेतला.

या घटनेवर समाधान सरवणकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. वाद वगैरे असं काही झालं नाही. शेवटी तिथली लोकंही आमचीच आहेत. त्यांचे जे काही प्रश्न आहेत, त्यांना लायनी पाडायच्या आहेत. त्यांना पाण्याच्या लायनीदेखील मीच दिलेल्या आहेत. मेन जलवाहिनी मीच दिलेली आहे. त्या इम ारतीच्या तळमजल्यावर कुणालाही जमणार नाही तशी जीम बांधून दिली आहे, असं सम ाधान सरवणकर म्हणाले.

माझ्या निधीतून आणि स्वखर्चातून मी हे त्यांना जीम बांधून दिली आहे. त्या इमार-तीत माझे अनेक कामे आहेत. पण आता निवडणुकीत खूप इच्छुक झाले आहेत. त्यामुळे आम्ही काहीतरी करतोय हे त्यांना 'मातोश्री'वर दाखवायचं आहे. त्यांना तिथे कोण विचारत नाही. इमारतीचा विषय करुन ५० लोकं गोळा करणं, हे त्यांचं चालू आहे. तशाप्रकारे हा विषय होता, असं स्पष्टीकरण समाधान सरवणकर यांनी दिलं.

### पुण्यातील पंचतारांकीत हॉटेलला बॉम्बने उडवण्याची धमकी; कॉल करणारा जेरबंद

**पुणे (प्रतिनिधी)-** कोरेगाव पार्कमधील एका प्रसिद्ध पंचतारांकित हॉटेलला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाल्यानंतर शुक्रवारी दुपारी म ोठी खळबळ उडाली. हॉटेलच्या लँडलाईनवर आलेल्या फोनवर हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवला आहे, तात्काळ हॉटेल रिकामे करा अशी धमकी देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बॉम्ब शोधक पथक तात्काळ हॉटेलवर दाखल झाले.

हॉटेलची कसून तपासणी करण्यात आली. मात्र, कोणतीही संशयास्पद वस्तू न आढळल्याने हा कॉल 'फेक' असल्याचे स्पष्ट झाले. अचानक झालेल्या या गोंधळानंतर हॉटेलमधील कर्मचारी आणि ग्राहकांनी सुटकेचा निश्वास टाकला. पोलिसांकडून मि ळालेल्या माहितीनुसार, हा कॉल एका मोबाईल क्रमांकावरून करण्यात आला होता. प्राथमिक तपासानंतर संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे.

# 'महायुतीत आरपीआयला भीक मागावी लागते'

## आरपीआयचे नेते रामदास आठवलें यांनी व्यक्त केली खंत

**पुणे (प्रतिनिधी) -** महायुतीतून जागा मिळवण्यासाठी आरपीआयला भीक मागावी लाग-ते, अशी खंत केंद्रीय राज्यमंत्री आणि आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. आगामी निवडणुकांमध्ये जागावाटपावरून त्यांनी आपल्याच पक्षावर नाराजी व्यक्त केली असून, युती न झाल्यास शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीसोबत जाण्याचा इशाराही दिला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपकडे युतीसाठी आठवले यांनी ८-९



जागांची मागणी केली आहे.

रामदास आठवले यांनी महायुतीतील जागावाटपाच्या मुद्द्यावरून आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. निवडणुका जवळ आल्यावर सर्वच पक्ष जागा लढवण्याच्या तयारीत असतात, मात्र आरपीआयच्या बाबतीत तसे नाही, असे त्यांनी म्हटले आहे. महायुतीतून जागा मिळाव्या म्हणून आपल्याला भीक मागावी लागते, असे खंतजनक विधान रामदास आठवले यांनी केले आहे. या विधानामुळे आरपीआय आगामी निवडणुकांसाठी स्वबळावर तयारी करत आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. आठवले यांनी पिंपरी-चिंचवड शहरात आयोजित एका कार्यकर्ता मेळाव्यात हे वक्तव्य केले.

# मैत्रिणीची हत्या करून तरुणाची आत्महत्या; पुण्यात दुहेरी हत्याकांड

**पुणे(प्रतिनिधी)-**पुणे शहरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. हत्या, मारामारी, गुंडागर्दी आणि 'कोयता गँगची' दहशत अशा घटनांनी पुणेकर त्रस्त आहेत. दरम्यान, आता पुन्हा एकदा पुण्याला हादरवणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एका तरुणाने आधी एका तरुणीची हत्या केली आणि त्यानंतर त्याने स्वत: देखील आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यातून समोर आला आहे. या दुहेरी घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. या तरुणाने तरुणीची हत्या नेमक्या कोणत्या कारणातून केली, हे अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाहीये. प्रेम संबंधातून हा प्रकार घडला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात सखोल चौकशी सुरू असल्याची माहिती पुणे पोलिसांकडून देण्यात आली आहे. पुणे पोलिसांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आणि पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

पुणे शहरातून एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना समोर आली आहे. एका तरुणाने आपल्या मैत्रिणीची निर्घृण हत्या करून त्यानंतर स्वतःचे जीवनही संपवल्याने शहरात तणावाचे वातावरण आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश काळे (वय २८) नावाच्या तरु-णाने पुण्यातील संगमवाडी परिसरात आपल्या मैत्रिणीची हत्या केली. त्यानंतर, त्याने तळेगाव येथे जाऊन स्वतःही आत्महत्या केली. हत्या झालेली तरुणी आणि आरोपी तरुण गणेश काळे हे दोघेही पुण्यातील रुबी हॉल रुग्णालयात कामाला होते.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त मध्य रेल्वेच्या विशेष अनारक्षित गाड्या



**मुंबई(प्रतिनिधी)-** मध्य रेल्वेने महापरिनिर्वाण दिनानिमित्त आंबेडकरी अनुयायांसाठी ४ डिसेंबर ते ८ डिसेंबरपर्यंत १५ विशेष अनारक्षित रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील नागपूर, नाशिक, वर्धा या विविध जिल्ह्यातून रेल्वेगाड्या चालवण्यात येणार आहे. या अनुयायांची गैरसोय होऊ नये, यासाठी रेल्वे १५ विशेष रेल्वेगाड्यांची घोषणा केली आहे. अनुयायांसाठी सलग तीन दिवस रेल्वेकडून विशेष गाड्यांची सोय करण्यात आली आहे.

४ डिसेंबर रोजी गाडी क्रमांक ०१२६० नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून १८.१५ वाजता सुटेल. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२६२, नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून २३.५५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. ५ डिसेंबर रोजी गाडी क्रमांक ०१२६४ नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून ८ वाजता सुटेल आणि छत्रपती शिव-ाजी महाराज टर्मिनस येथे त्याच दिवशी २३.४५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२६६ नागपूर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस विशेष गाडी नागपूर येथून १८.१५ वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी १०.५५ वाजता पोहोचेल.

६ डिसेंबर रोजी गाडी क्रमांक ०१२४९ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २०.५० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ११.२० वाजता पोहोचेल. ७ डिसेंबर रोजी गाडी क्रमांक ०१२५१- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १०.३० वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ००.५५ वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१२५५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १२.३५ वाजता सुटेल आणि नागपूर येथे दुसऱ्या दिवशी ३.०० वाजता पोहोचेल. ८ रोजी सुटणारी गाडी क्रमांक ०१२५७ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नागपूर विशेष गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल. ७ डिसेंबर रोजी गाडी क्रमांक ०१२५३ दादर नागपूर विशेष गाडी दादर येथून ००.४० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १६.१० वाजता पोहोचेल.

### आरबीआयच्या पतधोरणविषयक समितीची लवकरच बैठक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)-** रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पतधोरण विषयक समितीची बैठक ३ डिसेंबर ते ५ डिसेंबर या दरम्यान पार पडणार आहे. महागाईचा दबाव कमी असल्यानं आरबीआयकडून ५ डिसेंबरला रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉईंट कपात करण्याची शक्यता आहे. रेपो रेटमध्ये कपात केल्यास गृह कर्ज आणि वाहन कर्जाचे व्याज दर कमी होतील. यामुळं गृहकर्ज आणि वाहन कर्ज असलेल्यांचा ईएम आय कमी होईल.

आरबीआयच्या पत-धोरणविषयक समितीची बैठक ३ डिसेंबरपासून सुरु होईल. या बैठकीत रेपो रेट आणि इतर गोष्टींवर चर्चा करुन निर्णय घेतले जातील. रेपो रेट संदर्भातील निर्णय ५ डिसेंबरला जाहीर केले जातील. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा सकाळी १० वाजता रेपो रेट जाहीर करतील.

# नगरपालिकेच्या मतदानादिवशी कामगारांना सुट्टी न दिल्यास कारवाई



**मुंबई (प्रतिनिधी) -** राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायता निवडणुकांच्या अनुषंगाने प्रचाराने जोर धरला असून शेवटच्या दोन दिवसांवर ही निवडणूक आली आहे. तब्बल ९ वर्षानंतर बहुतांश नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. त्यामुळे, प्रत्येक नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी ही निवडणूक महत्त्वाची मानली जाते. म्हणूनच, यंदा निवडणुकीत मतदान करुन लोकशाही बळकट करण्यासाठी आपलं योग-दान देणं बंधनकारक आहे. त्याच, पार्श्वभूमीवर येत्या २ डिसेंबर २०२५ रोजी कामगारांना भरपगारी सुट्टी देणे बंधनकारक आहे. प्रशासनाने या संदर्भातील आदेश जारी केले असून, कामगारांना मतदानाच्या दिवशी पगारी रजा देण्याचे बजावले आहे. तसेच, कामगारांनी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असेही आवाहन केले आहे.

राज्यात नगरपरिषदा व नगरपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार आहे. लोकप्रतिनिधित्व कायदा १९५१ च्या कलम १२५(बी) अन्वये मतदानाच्या दिवशी कामगारांना भरपगारी सुट्टी देणे बंधनकारक आहे. मागील निवडणुकांत काही आस्थापनांनी सुट्टी न दिल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या होत्या. त्यामुळे यंदा विशेष खबरदारी घेत, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्था-पना, दुकाने, कारखाने, हॉटेल्स, मॉल्स, आयटी कंपन्या, व्यापारी प्रतिष्ठाने आदींना हे आदेश लागू राहतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

अत्यावश्यक व अविरत सेवांमध्ये सुट्टी देणे शक्य नसल्यास कर्मचारी व कामगारांना २ ते ३ तासांची विशेष सवलत देऊन मतदानाचा हक्क बजावता येईल, याची संबंधितांनी काळजी घ्यावी, असे प्रशासनाने निर्देश दिले आहेत.

# बाईक टॅक्सी चालकाच्या खात्यात ३३१ कोटी रुपये

**नवी दिल्ली(प्रतिनिधी)-** राजधानी दिल्लीत सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) मनी लॉन्ड्रिंग प्रकरणाच्या तपासा-दरम्यान एका बाईक टॅक्सी चालकाच्या बँक खात्यात तब्बल ३३१ कोटी रुपये जमा केल्याचे आढळले आहे. ही रक्कम केवळ ८ महिन्यांत जमा करण्यात आली होती.

